# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date 15 February 2025
# Time 11.00 to 11.05 AM
# Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक: १५ फेब्रुवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.

****

अमेरिकेचा दौरा आटपून पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी भारतात परतले. मोदी यांच्या या दौऱ्यादरम्यान भारत आणि अमेरिका यांनी २०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार ५०० बिलियन डॉलर्सपर्यंत नेण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल वॉशिंग्टन इथं संयुक्त पत्रकार परिषद घेतली, या परिषदेत पंतप्रधान मोदी यांनी ही माहिती दिली. दहशतवादाविरोधातील लढ्यात भारत आणि अमेरिका खंबीरपणे एकमेकांसोबत उभे आहेत असं सांगून सीमेपलिकडील दहशतवाद संपवण्यासाठी कारवाई आवश्यक असल्यावर दोन्ही देशांचं एकमत झाल्याचं मोदी म्हणाले. दरम्यान, २६/११ च्या मुंबई हल्ला प्रकरणातला मुख्य आरोपी तहव्वूर राणा याला कायदेशीर कारवाईसाठी भारताच्या ताब्यात देण्याच्या अमेरिकेच्या घोषणेचं मोठ्या प्रमाणात स्वागत झालं.

****

नाशिक – त्र्यंबकेश्वर इथे आगामी काळात होणारा सिंहस्थ कुंभमेळा सुरक्षित होईल, असं नियोजन करावे. भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेत रस्ते, साधूग्रामच्या भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने सुरू करत कामांना गती द्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. यासंदर्भातल्या बैठकीत काल नाशिक इथे ते बोलत होते. कुंभमेळ्यासाठीच्या कामांना प्राधान्य देण्यात येईल. त्यानुसार देशभरातून होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेता वाहतुकीचे नियोजन करताना रस्त्यांचा आवश्यक तिथे विस्तार करावा, आदी सूचनाही त्यांनी यावेळी संबंधितांना दिल्या. दरम्यान काल उपमुख्यमंत्री शिंदे यांनी काल नाशिक इथे विधानसभा निवडणुकीतील यशाच्या पार्श्वभूमीवर आभार सभा घेतली.

****

भारतीय डाक विभागामार्फत अधीक्षक डाकघर, नवी मुंबई विभाग यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण डाक सेवक पदासाठी २१ रिक्त पदे भरली जाणार आहेत. पात्र, इच्छुक उमेदवारांनी ०३ मार्च, २०२५ पर्यंत india post gds online.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावे, असं आवाहन नवी मुंबई विभागाचे वाशी येथील वरिष्ठ अधीक्षक यांनी केलं आहे. उमेदवाराने अर्ज ऑनलाईन पद्धतीद्वारे करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी संकेस्थळास भेट द्यावी. नियम व अटी वरील संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

****

मराठी चित्रपटांसाठी एक पडदा सिनेमागृहांसाठी सवलत योजनेचा मसुदा तयार करण्याचे निर्देश सांस्कृतिक कार्यमंत्री विधिज्ञ आशिष शेलार यांनी दिले आहेत. मराठी चित्रपट सृष्टीतील कलाकार, निर्माते, दिग्दर्शक यांनी वेळोवेळी मांडलेल्या समस्यांपैकी एक पडदा चित्रपटगृहाच्या समस्यांसंदर्भात मुंबईत आयोजित बैठकीत काल ते बोलत होते. राज्यात १२०० हून अधिक एक पडदा चित्रपटगृहं असून त्यातली फक्त ४७५ चित्रपटगृहं सुरु आहेत. उर्वरित सिनेमागृहांच्या सद्यस्थितीबद्दल उपलब्ध माहिती मिळवावी आणि बंद असलेली चित्रपटगृहं चालू करून त्यांनी फक्त मराठी सिनेमा दाखवावा आणि या चित्रपटगृहांना सवलती देण्याबाबतच्या स्वतंत्र योजनेचा मसुदा तयार करण्यात यावा, असे निर्देशही शेलार यांनी यावेळी दिले.

****

जलसंपदा विभागाकडील अधिकाऱ्यांना धरण, कालवे, बंधारे बांधणे यासह या क्षेत्रातील नवनवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचे प्रक्षशिक्षण मिळायला हवं. यासाठी महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनीने सर्वसमावेशक असा प्रशिक्षण कार्यक्रम तयार करावा, अशा सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिल्या आहेत. सह्याद्री अतिथी गृह येथे महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) तसेच कोयना वीजनिर्मिती प्रकल्प यांचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी जलसंपदा विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. जलसंपदा मंत्री विखे पाटील म्हणाले, जलसंपदा विभागामार्फत करण्यात येणाऱ्या कामांमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. हे तंत्रज्ञान क्षेत्रीय अधिकाऱ्यांना अवगत असणे काळाची गरज आहे. यासाठी तीन वर्षातून एकदा प्रत्येक अधिकाऱ्यांना हे प्रशिक्षण मिळायला हवं.

****

मराठवाडा साहित्य परिषदेच्या ४४ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाला आजपासून प्रारंभ होत आहे. या संमेलनासाठी छत्रपती संभाजीनगरनजिक वाळूज इथल्या दगडोजीराव देशमुख महाविद्यालयात विलासराव देशमुख साहित्यनगरी साकारण्यात आली आहे. डॉ. भीमराव वाघचौरे हे संमेलनाध्यक्ष तर विजय राऊत स्वागताध्यक्ष आहेत. या दोन दिवसीय संमेलनात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

रायगड किल्ला संवर्धन व परिसराच्या विकासासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्याचा अभ्यास करून लवकरच पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी सांगितलं. यासंदर्भात मंत्रालयात बैठक झाली. आशिष शेलार म्हणाले, रायगड विकास प्राधिकरणातर्फे ६०० कोटींचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार रायगड किल्ला, परिसराचा विकास करण्यात येणार आहे.

****